# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास विभाग



**मा. श्री. देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

# पेसा ग्रामपंचायतींना मुक्त निधी
# मार्गदर्शक पुस्तिका





**मा. श्री. विष्णु सवरा**
मंत्री, आदिवासी विकास

।। आदिवासी उपयोजनेतून मिळणार,
निधी थेट गावाला ।।
।। येईल वेग आता, गावाच्या विकासाला ।।



**मा. श्री. राजे अम्ब्रीशराव**
राज्य मंत्री, आदिवासी विकास



**श्री. राजगोपाल देवरा**
सचिव, आदिवासी विकास

## : मनोगत :

राज्यातील आदिवासी जमातीचे सांस्कृतिक वैविध्य तसेच त्यांचे वास्तव्य असलेल्या क्षेत्रातील नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती यामुळे आदिवासींच्या विकासातील समस्या व गरजा अत्यंत वैविध्यपूर्ण ठरतात. प्रत्येक गावातील स्थानिक समस्या व गरजांनुसार विकासाचे कार्यक्रम जर ग्रामसभेलाच ठरविता आले तर गावाचा विकास वेगाने व नेमकेपणाने होऊ शकेल. याकरिता आता आदिवासी उपयोजनेतंर्गत ५% निधी दरवर्षी थेट ग्रामपंचायतीना देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला आहे. देशात प्रथमच महाराष्ट्र राज्याने असे प्रगतीशील पाऊल उचलले आहे. त्यामध्ये ग्रामपंचायतींना निधी कसा मिळेल, तो कसा वापरावा, कोणत्या कामांसाठी उपयोगात आणता येईल, त्यामधून गावाचा सर्वांगिण विकास कसा करता येईल, तसेच त्याकरिता ग्रामसभा कोणाची मदत घेऊ शकेल इत्यादीबाबत ही पुस्तिका निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

(राजगोपाल देवरा)
सचिव, आदिवासी विकास

प्रस्तावना :

आपल्या भारत देशाला खूप प्राचीन आणि वैविध्यपूर्ण आदिवासी संस्कृती लाभली आहे. भारतात सुमारे ७०० आदिवासी जमाती आहेत ज्यापैकी ४५ जमाती आपल्या महाराष्ट्र राज्यात आढळतात. प्रत्येक आदिवासी जमातींची परंपरा आणि जीवन जगण्याच्या पध्दती अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आदिवासींना त्यांची संस्कृती, परंपरा आणि भोवतालचा नैसर्गिक परिसर यांचे जतन करता यावे, यासाठी पंचायत (अनुसूचित क्षेत्र विस्तार) अधिनियम तसेच वन हक्क अधिनियम अशा कायद्यांद्वारे आदिवासी ग्रामसभांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत.



आदिवासींच्या विकासासाठी शासनाने स्वतंत्र आदिवासी उपयोजना लागू केली आहे. या उपयोजनेमार्फत आदिवासी क्षेत्रासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात येते, ज्याचा विनियोग केवळ आदिवासींच्या विकासाकरीता करणे बंधनकारक आहे . आदिवासी उपयोजनेमार्फत विविध योजना राबविण्यात येतात, ज्यामुळे आदिवासी समाजाचे उत्थान होण्यास निश्चितच मदत झाली आहे. आदिवासी जमातींचे सांस्कृतिक वैविध्य आणि विकासाच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजा लक्षात घेता प्रत्येक गावामध्ये ग्रामसभेनेच विकासाचे उपक्रम ठरविणे आवश्यक आहे, तरच आदिवासी खऱ्या अर्थाने स्वावलंबी होऊ शकतील. याद्दष्टीने, आता आदिवासी उपयोजनेतून काही निधी थेट गावालाच देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे, आता आपल्या गावाचा विकास आपल्यालाच साधायचा आहे. चला ही आगळी - वेगळी योजना आपण समजावून घेऊ या !





## निधी येणार गावाला, थेट ग्रामपंचायतीच्या खात्याला !

आपल्या गावाच्या लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतीला निधी मिळेल. यासाठी आपल्या ग्रामपंचायतीचे एक वेगळे बँक खाते आपल्याला उघडावे लागेल. प्रत्येक वर्षी शासनाकडून आपल्या ग्रामपंचायतीच्या खात्यावर निधी बँकेमार्फत थेट पोहचेल. यामुळे वर्षाच्या सुरुवातीलाच निधी जमा होईल आणि वर्षभरात तो आपल्या गावाच्या विकासासाठी चांगल्या प्रकारे उपयोगात आणता येईल. हा निधी आपल्या ग्रामपंचायतीमध्ये येणाऱ्या सर्व महसुली गावांसाठी आणि पाड्यांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात वापरायचा आहे ज्यामुळे सर्वांना त्याचा लाभ मिळेल आणि विकासापासून कोणीही वंचित राहणार नाही.



## ग्रामसभाच देणार आता, मान्यता निधीच्या खर्चाला !

ग्रामपंचायतीला मिळालेल्या निधीतून कोणती कामे करायची हे आता ग्रामसभाच ठरवेल ! यामुळे गावाच्या विकासाचे निर्णय आता आपल्याला झटकन घेता येतील आणि त्यांची अंमलबजावणी देखील तितकीच पटकन होऊ शकेल !

ग्रामसभेच्या मान्यतेने आणि ग्रामपंचायतीच्या सल्ल्याने आपल्या गावाची - ग्राम संसाधन नियोजन व व्यवस्थापन समिती निधी खर्च करेल. तीन लाख रुपयांपेक्षा जास्त खर्चाचे काम असेल तरच पंचायत समितीला प्रस्ताव पाठवून मान्यता घ्यावी लागेल.



## करूया विकास सर्वांचा, निसर्गाचा आणि मानवाचा ।

या निधीतून आपल्या गावाचा संपूर्ण विकास करण्यासाठी आपल्याला चार प्रकारची कामे करायची आहेत.

हे चार विषय आहेत १) ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येक गाव आणि पाड्यावर पायाभूत सुविधा निर्माण करणे २) स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षणाचा लाभ गावातल्या प्रत्येकापर्यंत पोहोचविणे ३) आपल्या गावाचे जंगल / निसर्ग / जलस्त्रोत याचे

संवर्धन करणे आणि ४) वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका. दरवर्षी ग्रामसभेमध्ये या चारपैकी एका विषयाची निवड करून ती कामे वर्षभरात पूर्ण करायची आहेत. पुढच्या वर्षी उरलेल्या तीन पैकी एका विषयाची निवड करायची आहे. यामुळे आपल्या गावाचा विकास सगळ्या बाजूंनी होईल आणि आपल्या गरजा गावातच पूर्ण होतील.



**आराखडा बनेल नियोजनाचा, गावाच्या शाश्वत विकासाचा ।**

गावाच्या निधीचा वापर ठरविण्याचे स्वातंत्र्य ग्रामसभेला मिळणार आहे पण त्या निधीचा योग्य प्रकारे वापर करण्याची मोठी जबाबदारी सुध्दा ग्रामसभेवर येणार आहे. यासाठी ग्रामसभेने गावाचा पध्द्तशीर नियोजन आराखडा तयार करणे आवश्यक आहे. आराखडा दोन प्रकारे करायचा आहे. पुढल्या पाच वर्षात आपल्या ग्रामपंचायतीचा विकास कसा व्हावा याचा दृष्टीक्षेप आराखडा आणि प्रत्येक वर्षी करायच्या कामांचा वार्षिक आराखडा. दरवर्षी दि. १ मे रोजीच्या ग्रामसभेमध्ये वार्षिक आराखड्याला मान्यता द्यायची आहे. आराखडा तयार करताना ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये येणाऱ्या प्रत्येक गावातील / पाड्यावरील लोकांचा विचार घेणे आवश्यक आहे. त्यानंतर ग्रामसभेमध्ये सर्वांच्या सहमतीने ग्रामपंचायतीचा आराखडा एकत्र करायचा आहे.

## काय करू काय नको, विकासात अविचार नको ।

गावाला मिळणाऱ्या थेट निधीतून आपल्या इतर योजनांखाली होऊ शकणारी नेहमीची कामे सोडून काही वेगळी आणि विशेष स्वरूपाची कामे करायची आहेत. ज्यामुळे गावाचा समतोल विकास होऊन गाव स्वावलंबी बनू शकेल. खाली दिलेल्या निकषांचा ग्रामसभेमध्ये काळजीपूर्वक विचार करून आपल्याला कामे निवडायची आहेत.

**या बाबींवर खर्च करता येईल :**

- कौशल्यवृध्दी, रोजगार व उत्पन्न वाढ
- सार्वजनिक सुविधा जसे भात गिरणी, धान्य बँक
- शिक्षण, आरोग्य, पोषण इत्यादी सेवांचे बळकटीकरण
- दूरसंचार व दळण - वळण सुविधांचे बळकटीकरण
- सामुदायिक संसाधनांचे जतन व व्यवस्थापन
- दुर्गम क्षेत्रामध्ये अतिरिक्त सुविधा / कर्मचारी देणे
- छोटे तलाव, गौण खनिजे इत्यादीचे व्यवस्थापन
- सार्वजनिक वन हक्काचे उपक्रम
- गौण वन उपजावर प्रक्रिया व विक्रीच्या सुविधा
- पर्यटन विकासाचे उपक्रम
- नादुरुस्त सुविधांची दुरुस्ती व पुनरूज्जीवन
- ग्रामपंचायत व ग्रामसक्षमीकरण

**या बाबींवर खर्च करू नये ।**

- वैयक्तिक लाभ
- इतर योजनांखाली सहज मिळणारा लाभ
- ४० % पेक्षा अधिक बांधकाम
- घरांना जोडणारे अंतर्गत रस्ते
- गावाचे प्रवेशद्वार / कमान , सुशोभीकरण
- गावाचे कर संकलन उद्दिष्ट पूर्ण करणे
- ग्रामपंचायतीचे वीज बिल / देयके भरणे
- लाभार्थी हिश्याची रक्कम
- धार्मिक सण / समारंभ / उत्सव
- आदिवासी विकासाखेरीज इतर विषय




**पुढाकार असावा गावाचा, मदतीचा हात सर्वांचा ।**

गाव विकासाचा आराखडा तयार करून त्याप्रमाणे उत्तम दर्जाची कामे राबविण्यासाठी ग्रामसभेला चांगल्या स्थानिक संस्थांची मदत घेता येईल. गरजेनुसार ग्रामपंचायतीच्या कामात मदतीसाठी कंत्राटी कर्मचारी नेमता येतील. गावातील विविध समित्या गावाच्या विकासात सहाय्य करतील. ग्रामसभेच्या मागणीनुसार प्रशासकीय विभागांचे अभियंता, तांत्रिक व्यक्ती हे देखील गावाला तांत्रिक मार्गदर्शन करतील. ग्रामसभा, ग्रामपंचायत व ग्रामसमित्या यांना सक्षम बनविण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देखील आपल्याला मिळेल. या सर्व मदतीचा वापर करून गावाला मिळणाऱ्या निधीचा सर्वाधिक चांगला वापर ग्रामसभेने करावयाचा आहे.

**खर्चाला असावी शिस्त, त्याची गावावरच भिस्त .**

दरवर्षी गावाच्या निधीतून झालेली कामे आणि खर्च याची तपासणी आणि लेखाजोखा गावानेच केला पाहिजे व त्याची माहिती ग्रामपंचायतीच्या रजिस्टरमध्ये आणि सूचनाफलकावर जाहीर केली पाहिजे. यामुळे गावात विश्वासाचे वातावरण निर्माण होईल आणि गावाच्या विकासात सर्वांचा मनापासून सहभाग मिळेल. ग्रामसभेमध्ये वार्षिक खर्चाला मान्यता घेऊन निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय पुढच्या वर्षीचा निधी आपल्या गावाला मिळणार नाही. निधीचा वापर सचोटीने केला पाहिजे. कामे/खर्च यामध्ये गैरव्यवहार आढळून आला तर गावाला पुढे निधी मिळणार नाही.



**गाव सुधारू आधी, मिळवू प्रोत्साहन निधी ।**

या योजनेच्या पहिल्या वर्षी लोकसंख्येनुसार १००% निधी ग्रामपंचायतींना मिळेल. मात्र, दुसऱ्या वर्षापासून ५०% निधी ग्रामपंचायतींच्या कामगिरीनुसार देण्यात येईल. १००% निधी मिळविण्यासाठी गावाला काही अटी पूर्ण कराव्या लागतील जसे, गावातल्या कुपोषित मुलांचे प्रमाण कमी झाले पाहिजे, बाल विवाह थांबले पाहिजेत, मुलींची शाळेतून गळती होता कामा नये, जंगलावर अतिक्रमण व्हायला नको, संपूर्ण कर वसुली झाली पाहिजे, इत्यादि. ज्या ग्रामपंचायती उत्कृष्ट काम करतील त्यांना काही निधी बक्षीसरुपाने देखील मिळू शकेल. त्यामुळे, संपूर्ण गावाने पुढाकार घेऊन या योजनेत चांगले काम करुन दाखवायचे आहे.

अशा प्रकारे गावाच्या विकासातील अनेक उपक्रम आता गावालाच राबविता येणार आहेत. त्यासाठी प्रत्येक वर्षी निधी थेट ग्रामपंचायतीला मिळणार आहे. गावाच्या विकासाचा आराखडा आता ग्रामसभाच मंजूर करेल. आराखडा राबविण्याची जबाबदारी देखील गावाचीच राहील. त्यामुळे, आदिवासी गावांना आपली संस्कृती, संसाधने, परिसर, स्थानिक वैशिष्टये हे सर्व विचारात घेऊन आपल्या विकासाची दिशा व वाटचाल ठरविता येईल. चला तर, या संधीचा पुरेपूर फायदा घेऊ आणि आपणच होऊ आपल्या विकासाचे शिल्पकार ।

आदिवासी जनहिताय

| | |
|---|---|
| श्री. राजगोपाल देवरा, भा. प्र. से.<br>सचिव,<br>आदिवासी विकास विभाग,<br>मंत्रालय मुंबई - ४०० ०३२. | श्रीमती सोनाली पोंक्षे -वायंगणकर, भा.प्र.से.<br>आयुक्त,<br>आदिवासी विकास,<br>आदिवासी विकास भवन,<br>नासिक - ४२२ ००२. |

**संकेत स्थळ** :- http://tribal.maharashtra.gov.in

**सहाय्यता क्रमांक** :- 022-61316400